# करारनामा

विद्युत विभाग, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

विद्युत विभाग:- पीएमपीएमएल/विद्युत विभाग/२५११ दि. ८/१०/२०२१
वर्कऑर्डर क्र.

कामाचे नांव:- महामंडळाकडील अस्तित्वातील कार्यान्वीत असलेल्या मॅन्युअल ऑपरेटेड लिपटच्या वार्षिक देखभाल दुरूस्तीची कामे करणेबाबत.

ठेकेदाराचे नांव :- मे. प्रगती एलिव्हेटर्स,

पत्ता:- पवन पॅलेस, फ्लॅट नं.१५,
रायकर नगर, धायरी, पुणे ४१.

कामाची मुदत :- दि.१०/१२/२०२१ ते दि.९/१२/२०२४

पुर्व गणित रक्कम रू:- ११,८८,०००/- (१ % कमी)

निविदा रक्कम रू.:- ११,७६,१२०/-

अनामत रक्कम रू:- ५९,४००/-

करारनामा फी :- ७००/-

मसूदा फी:- ३५०/-

Scanned with OKEN Scanner

प।३६२

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2021 ◑ BG 257652

23 NOV 2021

अनु.क्र. ०१३६० दि. ............... मु.शु.रक्कम ५००/-

दस्ताचा प्रकार ............... करारनामा

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन ...............

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता मे. प्रगती इलिव्हेटर्स धायरी पुणे ४१

दुसऱ्या पक्षकाराचे नांव PMT

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता सोमनाथ थेउरकर / गणेश पेठ पुणे

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

राहूल एस. नाईक
परवाना क्र. २२०११२१
१४१, गुरुवार पेठ, पुणे-४२.

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला, त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

15 NOV 2021

मुद्रांक लिपीक ... पुणे कार्यालय

# करारनामा

आज दिनांक १० माहे नोव्हेंबर सन २०२१ इरावी ते दिवशी करारनामा करुन देतो ऐसाजे......

मे. प्रगती एलिव्हेटर्स तर्फे प्रोप्रायटर
श्री. रवींद्र बाळकृष्ण पाटील,
वय वर्ष:-५६, धंदा:- व्यवसाय
पवन पॅलेस, फ्लॅट नं.१५,
रायकर नगर, धायरी, पुणे ४१.

(करारनामा लिहून देणार)

Scanned with OKEN Scanner

या नावाने भारतात ठेकेदारची व्यवसाय करणारी फर्म तीचे वतीने व त्यांचे वालीवारस, निष्पादक, अभिहस्तांकरीता या पुढे ज्यांचा उल्लेख ठेकेदार (कॉन्ट्रॅक्टर) असा केलेला आहे.

आणि

मा.डॉ.चेतना केरूरे,
सहव्यवस्थापकीय संचालक,
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
स्वारगेट, पुणे-४११०३७.

(करारनामा लिहून घेणार)

यापुढे ज्यांचा लिहून घेणार असा उल्लेख केला आहे. यामध्ये कायद्यामध्ये विहित असलेल्या संदर्भात विश्लेषणाविरुध्द नसलेले असे त्यांचे वारस, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. म्हणून त्या त्या वेळी पदधारण करणारी व्यक्ती यांचा समावेश आहे. यापुढे त्यांचा उल्लेख पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. असा केलेला आहे. कंपनी ॲक्ट अन्वये मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार जाहिरात क्र. विद्युत/०१/२०२१ दि.३/०६/२०२१ रोजी दै. महाराष्ट्र टाईम्स, पुणे या दैनिकात निविदा क्र.४-विद्युत-२०२१ ची जाहिरात देऊन.

(कामाचे नांव) महामंडळाकडील आस्तित्वातील कार्यान्वीत असलेल्या मॅन्युअल ऑपरेटेड लिफटच्या वार्षीक देखभाल दुरूस्तीची कामे करणेबाबत.

विषयांकित कामाची मुदत दिनांक १०/१२/२०२१ ते दिनांक ९/१२/२०२४ इतकी आहे.

नमुन्यातील निविदा मागविण्यात आली होती. उपरोक्त जाहिरातीस अनुसरुन लिहून देणार यांना याकामी निविदेतील शेड्युल बी मधील परिणाम, दर, तपशील, निविदेतील अटी व शर्ती इ. माहितीप्रमाणे आपली निविदा परिवहन महामंडळास सादर केली आहे. लिहून देणार यांनी भरलेली रक्कम रुपये ११,७६,१२०/- ची निविदा यथास्थितीत लिहून घेणार यांनी मान्य करुन स्विकारली आहे. सदर मान्य निविदेतील अटी व शर्ती यांना आधिन राहून लिहून देणार जाहीर करीत आहे व स्वखुषीने लिहून देत आहे की,

१. उपरोक्त काम विश्वासार्हतेने पार पाडण्यासाठी कामाची गुणवत्ता व दर्जा राखून काम विहित मुदतीत पुर्ण करण्याचे जबाबदारीपोटी अनामत रक्कम म्हणून (सिक्युरिटी डिपॉझिट) जाहिरातीत दर्शविलेल्या निविदा रक्कम रु. ११,८८,०००/- च्या ५ टक्के रक्कम रुपये ५९,४००/- महामंडळाच्या नावे असणारी मुदत ठेवची पावती खात्यास सादर करावी. सदर मुदत ठेव वेळेत सादर न केल्यास उर्वरित अनामत रक्कम आपले बिलामधून वसूल करण्यांत येईल. बयाणा रक्कम रु. ८०,०००/- ऑनलाईन पावती क्र.CPAAWQAGB4 दि.२३/०६/२०२१ मनपाकडे जमा केलेली आहे.

Scanned with OKEN Scanner

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA © 2021 ©

ZD 414836

23 NOV 2021

अनु.क्र. ९९३६८ दि.................मु.शु.रक्कम १००/-

दस्ताचा प्रकार ............ प्रतिज्ञापत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन ..........................

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता रविंद्र बाळकृष्ण पाटील

धायरी पुणे ४१

दुसऱ्या पक्षकाराचे नांव PMTL

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता सोमनाथ थेउरकर । गणेश पेठ पुणे

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

राहूल एस. नाईक
परवाना क्र. २२०११२१
१४१, गुरुवार पेठ, पुणे-४२.

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला, त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

17 NOV 2021

प्रधान मुद्रांक कार्यालय पुणे करिता

२ निविदेसोबत जोडलेली सविस्तर निविदा सुचना पुरवणी निविदा सुचना निविदा फॉर्म प्राईस व्हेरीएशन क्लॉज शेड्युल ब व विशेष अटी व शर्ती पुर्ण करण्याच्या सयंत्राच्या विशिष्ट तपशील, जनरल स्पेसिफिकेशन व विशेष अटी लिहून देणार यांचे हमीपत्र व डिक्लेरेशन, वर्कऑर्डर कामाचे ड्रॉईंग्ज इ. या करारनाम्याचे अविभाज्य भाग आहेत. (पार्ट ऑफ धिस ॲग्रीमेंट) या भागात नमूद केल्याप्रमाणे सर्व अटी व शर्तीचे अधिन राहून तसेच महामंडळाच्या लिहून घेणार व मा. विद्युत अभियंता यांनी ठरवून दिलेल्या पद्धती व स्पेसिफिकेशनप्रमाणे कामाचे वाढीव अथवा कमी केलेले परिमाण, दुरूस्ती अथवा बदल केलेले नकाशे व परिमाण यानुसार संपूर्ण काम लिहून देणार यांना कामाची वर्कऑर्डर दिल्याचे तारखेपासून बदल केलेले नकाशे व परिमाण यानुसार संपूर्ण काम लिहून देणार यांनी कामाची वर्कऑर्डर दिल्याचे तारखेपासून ३ वर्ष (१०९५ दिवस) मुदतीत म्हणजेच दि. ९ /१२/२०२४ पर्यंत समाधानकारक पुर्ण करणेचे मान्य व स्विकृत केलेले आहे.

३. लिहून देणार व लिहून घेणार यांच्यातील या करारान्वये व निविदेतील अटी व शर्तीनुसार लिहून देणार यांनी केलेल्या कामापोटी वेळोवेळी द्यावयाची बिले काम गुणवत्तेनुसार व समाधानकारक झालेनंतर महामंडळाने त्वरेने अदा करावयाचे ठरले आहे.

४. विनिर्देशित काम पुर्ण झालेल्या दिनांकापासून १२ कॅलेंडर महिन्यापर्यन्तचा कालावधी डिफेक्ट लायबिलीटी पिरियड म्हणून धरला जाईल. या १२ महिन्यांच्या कालावधीत लिहून देणार यांनी केलेल्या कामात दोष अथवा उणिवा आढळून आल्यास लिहून देणार यांनी त्या स्वखर्चाने निविदा, अटी व शर्तीप्रमाणे दुरुस्त करुन या कालावधीत सदर निविदेतील काम सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी लिहून देणार यांची राहील असे लिहून देणार यांनी मान्य, कबूल व स्विकृत केलेले आहे. लिहून देणार यांना महामंडळ अशा दुरुस्त्या अथवा बदलापोटी कोणतीही रक्कम अदा करणार नाही. लिहून देणार यांचकडून या जबाबदारीपोटी अनामत म्हणून निविदा रक्कमेच्या ५ टक्के रक्कम रुपये ५१,४००/- अनामत रक्कम म्हणून कापून घेण्यात येईल व काम पूर्ण झालेपासून १२ कॅलेंडर महिने परिवहन महामंडळाकडे निविदेतील अटी व शर्तीप्रमाणे राखून ठेवण्यात येईल. अनामत रक्कम अंतिम बिल अदा केलेनंतर व देखभाल हमी कालावधी संपल्यानंतर अनामत रक्कम परत करण्यात येईल. विनिर्देशित ७ दिवसांच्या मुदतीमध्ये काम पुर्ण न केल्यास प्रतिदिन रक्कम रू. १००/- याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

५. लिहून देणार यांनी निविदेतील कामाचा विमा उतरविणे आवश्यक असून, तो विमा सदरील लिहून देणार यांनी ६० दिवसाचे आत रिसीट सादर करावी तसेच विमा कालावधीमध्ये विमा कंपनीकडे नुकसान भरपाई क्लेम करण्याची जबाबदारी लिहून देणार यांचेवर राहिल. डिफेक्ट लायबिलिटी पिरियड अस्तित्वात राहील व त्याबाबतचा पुरावा म्हणून प्रिमियम रिसीटी सादर केल्याशिवाय प्रत्यक्ष कामास सुरुवात करणार नाही. असे लिहून देणार यांनी मान्य कबूल व स्विकृत केलेले आहे.

Scanned with OKEN Scanner

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA © 2021 © ZD 414835

23 NOV 2021

अनु.क्र. ९९३६८ दि. ................ मु.शु.रकम १००/-

दस्ताचा प्रकार .............................. प्रतिज्ञापत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन ..............................

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव व पत्ता रविंद्र बाळकृष्ण पाटील

धायरी पुणे ४१

दुसऱ्या पक्षकाराचे नांव PMRD

हस्ते व्यक्तीचे नांव व पत्ता सोमनाथ धेंडरकर / कसबा पेठ पुणे

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही

राहूल एस. नाईक
परवाना क्र. २२०११२१
१४१, गुरुवार पेठ, पुणे-४२.

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला, त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

17 NOV 2021

मुद्रांक विक्रीक ... पुणे ...

Scanned with OKEN Scanner

६. सदर कराराचे संदर्भात कोणताही वाद उत्पन्न झाल्यास तो लवादाकडे सोपविण्यात येईल. लिहून घेणार व लिहून देणार यांचे संमतीने मा. लवाद यांची नियुक्ती करण्यात येईल. लवादाचा निर्णय लिहून घेणार व लिहून देणार यांचेवर अंतिम व बंधनकारक राहील. तसेच कोणताही वाद हा मे. पुणे क्षेत्रिय न्यायालयामध्ये राहील.

For Pragati Elevators

Partner

डॉ.चेतना केरूरे
सहव्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
( लिहून घेणार)

ठेकेदाराची स्वाक्षरी
(लिहून देणार)

साक्षः
१)

कनिष्ठ अभियंता (वि)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

Scanned with OKEN Scanner